# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०५/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

## खुनातील फरार आरोपीचा ०३ तासाच्या आत शोध घेवून अटक करण्यात नरखेड पोलीसांना यश

यातील मृतक नामे सतिश बाबाराव फुले, वय ३० वर्ष रा. सिंगारखेडा यास आरोपी नामे प्रविण अशोकराव बोरडे वय ३६ वर्ष रा. सिंगारखेडा ता. नरखेड यांनी दिनांक २२/०५/२०२४ रोजी रात्री ०८.३० वा. सुमारास मौजा सिंगारखेडा गावात हनुमान मंदिराजवळ हाताने व लाथाने गुप्त अंगावर, पोटावर, मारहाण केली तसेच कोणत्यातरी वस्तुने मारहाण करून जिवानिशी ठार मारून आरोपी फरार झाला आहे अशी माहिती दिनांक २३/०५/२०२४ रोजी ०९.०० वा. ठाणेदार पोलीस स्टेशन नरखेड यांना मिळाल्या वरून ठाणेदार पोलीस स्टेशन नरखेड यांनी लगेच घटनास्थळी स्टॉफ सह रवाना होवून मौजा सिंगारखेडा गावात घटनास्थळी भेट देवून गुन्हयाबाबत माहिती घेतली व गुन्हयाचे गांभिर्य पाहता आरोपी शोधकामी त्वरीत तपास पथके तयार करून फरार **आरोपी प्रविण अशोकराव बोरडे वय ३६ वर्ष रा. सिंगारखेडा** याचे शोधकामी पथके रवाना करण्यात आले. तपास पथकातील अंमलदार यांनी गुप्त माहिती काढुन आरोपीचा शोध घेवून आरोपीस सावनेर येथुन ताब्यात घेतले. आरोपी याचा ३ तासाच्या आत शोध घेवून अटक करून त्यास विश्वासात घेवून गुन्हयाबाबत विचारपूस केली असता नमुद मृतकाने शिवीगाळ केल्याचे कारणावरून जिवाने ठार मारल्याचे आरोपीने सांगितले असुन पुढिल तपास सुरू आहे. सदर बाबत पोलीस स्टेशन नरखेड येथे गुन्हा नोंद क्र. २६५/२०२४ कलम ३०२ भादंवी प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) व उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल यांच्या मार्गदर्शनात सपोनि कृष्णा रा. तिवारी ठाणेदार पोलीस स्टेशन नरखेड, पोलीस स्टॉफ पोहवा गजानन तितरे, पोहवा कुणाल आरगुडे, पोना स्वप्निल बोंडे, पोशि जालिंदर राठोड, पोशी ८९२, ९६८ चापोहवा पंकज डहाके ब.न १९२५ पोलीस स्टेशन नरखेड यांनी केली.

# समाजाबद्दल भडकावु वक्तव्य करणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

काल दिनांक २३.०५.२०२४ रोजी पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत कलम १५३ (अ), ५०५(२) भादवि सहकलम ३(iii), (iv), (vii), (xv), 5 महाराष्ट्र प्रोटेक्शन ऑफ पिपल्स सोशल बायकॉट (प्रिवेन्शन,प्रोबिशन,ॲन्ड रिड्रेसल) ॲक्ट २०१६ अन्वयें गुन्हा दाखल झाला आहे. त्यामध्ये आरोपी नामे— राहुल विरेंन्द्र देशमुख वय ५० वर्ष रा देशमुख पुरा काटोल या आरोपीने एक पॉम्प्लेट ज्यामध्ये एक पुर्ण समाज बहिष्कृत करून त्यांना हद्दपार करायचे या आशयाचा मजकुर छापुन या कामासाठी लोकांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला. आरोपीने जे पॉम्प्लेट छापले होते त्याचा उद्देश हा पुर्णपणे सांप्रदायिक आणि एका समाजाच्या विरोधात होता.

आरोपी राहुल देशमुख याच्या गुन्हेगारी अभिलेखामध्ये विनयभंग, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपिकरण, अश्लील शिवीगाळ करणे, गैरकायद्याची मंडळी जमवुन लोकांची अडवणुक करणे यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे ८ गुन्हे दाखल आहेत. सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन आरोपी राहुल देशमुख याला पोलीस स्टेशन काटोल यांनी त्याच्या राहत्या घरातुन अटक केले. व आज मा. प्रथम वर्ग न्यायालय काटोल येथे हजर केले असता मा. न्यायालयाने सदर आरोपी कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर सांप्रदायिक कृत्य करणार नाही, तसेच कायदा व सुव्यवस्था बिघडविणार नाही या अटीवर जामीन मंजुर केला.

नागपुर ग्रामीण पोलीसांमार्फत सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येत आहे कि, कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही समाजाच्या विरूध्द भडकावु वक्तव्य करू नये असे केल्यास त्यावर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर